


ही एका इंग्लिश मुलाची गोष्ट आहे.
अनाथ मुलांना कोणकोणत्या संकटांतून जावे लागते, किती हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते, ह्याचे वर्णन ह्या मुलाच्या गोष्टीत आहे आणि ते खरे आहे. अनाथ लहान मुलांना हाताशी धरून लबाड लुच्चे लोक आपले नीच धंदे कसे चालवितात, ह्याचे ह्या कथेतील वर्णन लहान-मोठ्यांना विचार करायला लावील.

सर्वच देशात ही अवस्था आहे. इंग्लिश मुलाची ही कथा वाचून तुम्हाला आपल्या देशातील अनाथ मुलांची आठवण होईल. अनाथ मुलांना चांगले संरक्षण, चांगले संस्कार लाभले, तरच ती मोठेपणी चांगले नागरिक होऊ शकतील. धनिक लोकांनी ह्या मुलांसाठी काही केले पाहिजे, असा लेखकाचा आशय आहे.

ह्या कथेचा लेखक चार्लस् डिकन्स् लहानपणी गरीब असल्याने त्याला स्वत:ला ह्या प्रसंगांना तोंड द्यावे लागले आहे. तो मोठेपणी प्रसिद्ध लेखक झाला. श्रीमान् झाला, पण तो आपले बालपण विसरला नाही.

डिकन्सने लहान मुलांच्या पुष्कळ कथा लिहिल्या. ह्या कथांनी इंग्लंडमधील लोक व सरकार जागे झाले. अनाथ लहान मुलांना संरक्षण देण्यासाठी अनेक कायदे व योजना करण्यात आल्या.

ऑलिव्हर ट्विस्ट अशा मुलांना कोणकोणत्या प्रसंगातून जावे लागते त्यांच्यासाठी काही करण्याचा प्रयत्न करायला हवा हे मुलांनाही कळेल.

*चार्लस डिकन्स हा दत्त आपटे यांच्या आवडत्या लेखकांपैकी एक होता. 'ऑलीव्हर ट्विस्ट'ची ही संक्षिप्त अनुवादित कथा, मुंबईच्या कर्नाटक प्रकाशन संस्थेने १९६३ साली प्रकाशित केली; पाच-सहा वर्षातच त्याची दुसरी आवृत्ती निघाली. बोलकी चित्रे हे या मराठी पुस्तकांचे वैशिष्ट्य होते.*


| **प्रकरण** | **पृष्ठ** |
|---|---|
| १ले | ५९२ |
| २ रे | ५९२ |
| ३ रे | ५९३ |
| ४ थे | ५९४ |
| ५ वे | ५९५ |
| ६ वे | ५९६ |
| ७ वे | ५९७ |
| ८ वे | ५९७ |
| ९ वे | ५९८ |
| १० वे | ५९९ |
| ११ वे | ६०० |
| १२वे | ६०० |



# ऑलिव्हर ट्विस्ट

१.

ऑलिव्हर जन्मला आणि पोरका झाला. निराश्रितांसाठी सरकारने चालविलेल्या एका वसाहतीत त्याचा जन्म झाला आणि आजारी असलेल्या त्याच्या आईने प्राण सोडला. ह्या वसाहतीत ना आई, ना बाप अशा स्थितीत त्याला वाढविणे शक्य नसल्याने, त्याची रवानगी एका अनाथगृहाकडे करण्यात आली.

अनाथ मुले सांभाळण्याचे काम 'मॅन' नावाच्या एक विधवा बाईकडे होते. ही बाई मुलांना सांभाळण्याचे सोडून, आश्रमाच्या पैशांतून आपणच चैन करी व मुलांची उपासमार करी. तेथील सारीच मुले कशीबशी रडत- कडत वाढत. ऑलिव्हर आठवे वर्ष संपेपर्यंत ह्या अनाथगृहात वाढला. पुढे एके दिवशी तो जन्मलेल्या वसाहतीचा व्यवस्थापक 'बंबल' मॅन बाईकडे आला आणि तिला म्हणाला, ''ऑलिव्हरला आता नववं वर्ष लागलं आहे, मी त्याला घेऊन जातो आणि कामधंद्याला लावतो.''

ह्या बाईच्या तावडीतून सुटका होणार म्हणून ऑलिव्हरला आनंद झाला. तो बंबलबरोबर जाण्यास खुशीने तयार झाला.

निराश्रितांच्या वसाहतीत येताच मात्र त्याला पुरा पश्चात्ताप झाला. कारण बंबल त्याला पुरेसे खायला तर घालीत नसेच, पण एवढ्या तेवढ्या कारणावरून भरपूर मार मात्र देत असे. एके दिवशी जास्त कांजी मागितल्याबद्दल तर तेथील आचाऱ्याने हातातील लाकडी पळ्याने त्याला यथास्थित झोडपले.

बंबलने तत्काळ तेथील मुडदेफरास बेरी ह्याला, एखाद्या गुलामाप्रमाणे ऑलिव्हरला विकून टाकले.

२

ऑलिव्हर बेरीबरोबर त्याच्या घरी गेला आणि त्याला पाहाताच बेरीची कजाग बायको ओरडून म्हणाली, ''काय पण मरतुकडा नोकर आणला आहे? हा काय काम करणार? नुसता गिळत बसेल मेला!''

बेरीकडे दुसरा एक धटिंगण पोऱ्या नोकरीला होता. त्याचे नाव नोव्हा! नोव्हा ऑलिव्हरला उगीचच्या उगीच येता जाता मारहाण करी. एके दिवशी स्वयंपाकगृहात हे दोघेच असता नोव्हा त्याला चिडविण्यासाठी म्हणाला,

''काय रे, तुझा बाप कुठे आहे?''

''मी तुला सांगितलं ना, मला काही विचारीत जाऊ नकोस म्हणून?'' ऑलिव्हर म्हणाला.

''अरे जाऽरे बेकार, तुझे आई बाप दोघेही बेपत्ता! मग तू तरी काय सांगणार?'' नोव्हा खद्खदा हसून म्हणाला. त्याच्या भाषणाने चिडलेल्या ऑलिव्हरने त्याचे नरडेच गपकन् धरले व करकचून आवळले.

ह्या हल्ल्याने नोव्हा त् त् प् प् करू लागला. त्याची दातखीळ वाजू लागली. एवढ्यात बेरीबाई व तिची मोलकरीण शारलोटी ह्या आत आल्या. त्यांनी ऑलिव्हरवर लाथाबुक्क्यांचा वर्षाव करून नोव्हाची सुटका केली. मग सुटलेल्या नोव्हानेही त्याला मरेपर्यंत मारले व कोंडून घातले. बेरीबाईने आरडाओरडा करून सारे घर गोळा केले व बंबल ह्याला बोलावून आणण्यास नोव्हाला पिटाळले.

बंबल आपला सोटा परजीतच येऊन दाखल झाला. दाराला तोंड लावून तो ओरडला, ''ऑलिव्हर!''

''दार उघडा! दार उघडा!'' ऑलिव्हर आतून ओरडला व त्याने दारावर धाड धाड लाथा मारल्या.

''ऑलिव्हर, मी कोण ओळखलंस?''

''होऽ!''

''माजला आहेस काय?''

''होय!'' बेफिकीरपणे ऑलिव्हर ओरडला.

त्याच्या ह्या उत्तराने बंबल थक्क झाला. बेरीबाईकडे वळून तो म्हणाला, ''मस्ती बरं ही बाई! तुम्ही त्याला पोटभर खाऊ घातलंत त्याचा हा परिणाम!''

''तरी मी मेल्याला कुत्र्याच्या थाळीतील उरले सुरले चार तुकडे चारीत होते!'' बेरीबाईने आपले औदार्य प्रगट केले. रात्र झाली. मारहाण व भूक ह्यांमुळे ऑलिव्हरला झोप लागणेच शक्य नव्हते. मध्यरात्री त्याने पळून जाण्याचा निश्चय केला. फाटके-तुटके कपडे आणि पावाचे चार दोन शिळे तुकडे गोळा करून त्याने आपले बोचके तयार केले व हळूच दार उघडून तो बाहेर पडला. बाहेर पडताच सरळ रस्ता धरून, त्याने नाकासमोर चालण्यास सुरुवात केली.

●●●

३

पाठलाग होऊ नये म्हणून तो झपझप जात होता. काही शंका आली, की लगेच तो एखाद्या झुडपाआड लपून बसे. कडक थंडी, भरपूर मार व उपवास ह्यांमुळे तो चांगलाच हैराण झाला होता.

उजाडता उजाडता, मैलाच्या दगडावरून, त्याला आपण लंडन शहरापासून सत्तर मैलांवर येऊन पोचलो आहोत हे कळून आले. ह्या शहरात एकदा गडप होता आले, की फिरून कोणाला आपला पत्ता लागणे शक्य नाही, ह्याची त्याला जाणीव होती.

एका झोपडीतील एका म्हातारीने त्याची दशा पाहून त्याला जेवू खाऊ घातले. जरा विश्रांती घेऊन तो पुढे निघाला व एके दिवशी पहाटे लंडन शहराजवळील बार्नेट गावी येऊन दाखल झाला.

पहाटेची वेळ व तशात कडक थंडी, ह्यामुळे बार्नेट गावात अद्यापि सर्व शांत होते. ऑलिव्हर विश्रांतीसाठी एका घराच्या पायरीवर बसून राहिला. थोड्या वेळाने चांगले उजाडले. कोवळे ऊन घरांच्या छपरांवर चमकू लागले. माणसे रस्त्यातून जा ये करू लागली. एवढ्यात एक मुलगा त्याच्यापुढे येऊन उभा राहिला. त्याच्या अंगांत एक भला मोठा कोट होता व त्या कोटाच्या खिशात त्याने आपले हात खोलवर खुपसले होते. एकंदरीत पोरगा जरी घामट दिसत होता, तरी चांगलाच बनेल असावा, असेही दिसत होते.

''तुझं नाव काय रे?'' त्याने विचारले.

''ऑलिव्हर!''

''कुठे चाललास? लंडनला?''

''होय!''

''तिथे कुणी ओळखीचं आहे?''

''नाही!''

''भूक लागली आहे वाटतं तुला?''

''होय!''

''चल माझ्याबरोबर. तुला खायला देतो.'' असे म्हणून ह्या नव्या पोराने ऑलिव्हरला एका उपाहारगृहात नेले व पोटभर खाऊ घातले. ह्या सहानुभूतीने ऑलिव्हरला त्याच्याबद्दल फारच प्रेम वाटू लागले. त्याने विचारले, ''तुझं नाव काय रे?''

''डॉजर!''

''तू इथेच राहातोस?''

''नाही, लंडनमध्ये!''

''तुझं घर आहे तिथे?''

''नाही, पण तिथे एक म्हातारे गृहस्थ आहेत, त्यांच्याजवळ राहातो मी! तू येतोस?''

''पण मला ते कसे ठेवून घेतील?''

''मी सांगेन त्यांना!''

मग दोघांचा लंडनला जाण्याचा विचार ठरला. दिवेलागणीचा सुमार होताच डॉजर व ऑलिव्हर लंडनच्या दिशेने चालू लागले.

●●●

## ४

मध्यरात्रीच्या सुमारास ते लंडन शहरात आले. ते ज्या भागातून चालले होते, तो भाग अगदी गलिच्छ असून, ठिकठिकाणी दारुड्या लोकांची भांडणे व शिवीगाळ चालू होती. डॉजरने, एका अंधाऱ्या बोळातील एका घराचे दार उघडून त्याला आत घेतले व लगेच दार लावून टाकले. घरात अंधार गुडुप असल्याने ऑलिव्हरला धडपडत चालावे लागत होते. डॉजर मात्र त्याचा हात धरून सफाईदारपणाने चालला होता, त्यावरून त्याला ह्या जागेची चांगलीच माहिती असावी, असे दिसत होते. करकरणाऱ्या एका मोडक्या जिन्यावरून ते वर गेले व डॉजरने एका दारावर थाप मारली.

''कोण आहे?'' आतून प्रश्न आला.

''मी डॉजर!''

लगेच दार उघडले गेले व ऑलिव्हरला घेऊन डॉजर आत गेला. टेबलावर, शामदानात एक मेणबत्ती जळत होती. ऑलिव्हरच्या वयाची तीन-चार पोरे टेबलावर पाय पसरून खुर्च्यांवर बसली होती व विड्या फुंकीत होती. शेगडीवर रट् रट् काही तरी शिजत होते. त्याचा वास सगळीकडे पसरला होता. लालसर दाढी व जटा असलेला एक म्हातारा 'ज्यू' तेथेच शेगडीपाशी बसला होता.

''हा पाहुणा कोण आणला आहेस रे?'' म्हाताऱ्याने आश्चर्याने डॉजरला विचारले.

''फॅगीनसाहेब, हा एक आपला नवीन दोस्त आहे!'' डॉजर म्हणाला.

''वाऽ वाऽ छान!'' म्हातारा म्हणाला व मग सर्वांनीच ऑलिव्हरचे स्वागत केले. त्याला भरपूर जेवण तर मिळालेच, पण मद्याचा एक पेलाही झोकण्यास मिळाला. इतका सुरेख आसरा आयुष्यात त्याला प्रथमच मिळाल्याने तो मोठ्या खुशीत झोपी गेला.

ऑलिव्हर सकाळी जागा झाला, तेव्हा तेथे कोणीच नव्हते. तो म्हातारा ज्यूच काय तो तेथे होता. एका पेटीमधून घड्याळे, आंगठ्या, चष्मे वगैरे वस्तू काढून त्यांचे निरीक्षण करण्यात तो गुंतला होता. फॅगीनचे लक्ष त्याच्याकडे जाताच, ऑलिव्हरने आपल्या सर्व वस्तू पाहिल्याची त्याला शंका आली. तो एकदम खवळला व ओरडून म्हणाला,

''काय रे कार्ट्या, काय पाहातो आहेस?''

त्याच्या खवळण्याचे कारण ऑलिव्हरच्या ध्यानात येईना. एवढा श्रीमंत माणूस ह्या भिकार जागेत का राहातो,

एवढेच त्याला कोडे पडले. आपल्या रागावण्याने पोराला शंका येईल असे वाटून, फॅगीनने आपले मन आवरले व तो समजुतीच्या स्वरात म्हणाला, ''म्हातारपणी आधार असावा, म्हणून ही पुंजी मी जमविली आहे, पोरा!'' इतक्यात डॉजर व एक मुलगा आत आला.

''यावे! काय डॉजर, आज काय कमाई?'' फॅगीनने विचारले.

''छाऽ! अगदीच भिकार!'' दोन डायऱ्या फॅगीनपुढे टाकीत डॉजर म्हणाला.

''चार्ली, तुझी रे काय कमाई?''

''काही विशेष नाही!'' खिशातून तीन-चार हातरुमाल काढून फॅगीनपुढे टाकीत तो दुसरा मुलगा म्हणाला.

ऑलिव्हरला ही भानगड काहीच समजेना!

●●●

## ५

कॉफी, पाव, वगैरे खाद्यपेयांवर यथास्थित ताव मारून झाल्यावर फॅगीनने एक डाव मांडला.

त्याने आपले कपडे अंगावर चढविले. खिशांत घड्याळ, हातरुमाल, तपकिरीची डबी, चष्मा, वगैरे वस्तू ठेवून दिल्या व फिरायला निघाल्याप्रमाणे तो तेथल्या तेथेच येरझारा घालू लागला. दुकानापुढे उभे राहून वस्तू निरखीत असल्याचे भासवू लागला. बाजारात हिंडणाऱ्या एखाद्या सभ्य म्हाताऱ्याची नक्कल त्याने हुबेहुब वठविण्याचे काम चालू केले होते. फॅगीनच्या पाठोपाठ डॉजर व चार्ली घिरट्या घालीत होते. इतक्यात चार्लीने फॅगीनच्या पायावर पाय दिला.

''स्ऽ हाय!'' करून तो खाली वाकताच डॉजरने त्याच्या खिशातील रुमाल सफाईने काढून घेतला. अशा रितीने फॅगीनची एक एक वस्तू लांबवून झाल्यावर खेळ संपला.

''छान, पोरांनो! खेळ तर खूपच रंगला!'' फॅगीनने पोरांना शाबासकी दिली. थोड्याच वेळात डॉजर व चार्ली बाहेर जाण्यास निघाले. फॅगीनने त्यांना खाऊसाठी पैसे दिले व तो म्हणाला, ''पोरांनो, चैन करा. पोटाचे मुळीच हाल करू नका!'' ते बाहेर जाताच तो ऑलिव्हरला म्हणाला, ''काय रे पोरा, तू शिकणार का ही विद्या?'' ऑलिव्हर त्याच्याकडे वेंधळी मुद्रा करून पाहू लागला.

थोड्याच दिवसात फॅगीनने ऑलिव्हरला ती विद्या शिकविलीच. मग एके दिवशी तो डॉजरला म्हणाला,

''डॉजर, चार्ली, आता तुम्ही तुमच्या ह्या दोस्ताला घेऊन जा ना रे कामगिरीवर!''

लगेच ही तिन्ही पोरे बाहेर पडली.

डॉजरने अस्तन्या मागे सारल्या होत्या व साहेबी टोपी खाली कपाळावर ओढून निम्मा चेहरा झाकला होता. तोंडाने शीळ घालीत तो रेंगाळत चालला होता. त्याचे हे रेंगाळणे पाहून ऑलिव्हरला वाटले, कामधंदा सोडून फॅगीनला फसविण्याचाच त्याचा विचार आहे. इतक्यात डॉजर थबकला व त्याने नाकावर बोट ठेवून आपल्या दोस्तांना काही इशारा दिला.

''शूऽ शूऽऽ तो म्हातारा पाहिलात का!'' त्याने हलकेच प्रश्न केला.

''तो त्या दुकानापुढे पुस्तकं पाहात उभा आहे तोच ना?'' चार्लीने विचारले.

''हो तोच. शिकार तर नामी दिसते!'' डॉजर म्हणाला.

तो आणि चार्ली त्या म्हाताऱ्याच्या आजूबाजूला चकरा मारू लागले. ऑलिव्हर त्यांच्याकडे आश्चर्याने पाहात उभा होता. इतक्यात डॉजरने शिताफीने म्हाताऱ्याचा

हातरुमाल मारला व चार्लीच्या हाती दिला. ऑलिव्हरला आता कोठे फॅगीनच्या पेटीत पाहिलेल्या वस्तूंचा उलगडा झाला. आपण कोणाच्या संगतीत आहोत व काय विद्या शिकत आहोत, ह्याचीही कल्पना त्याला आली. इतक्यात म्हाताऱ्याने खिशात हात घातला. ऑलिव्हर भीतीने धूम पळत सुटला. म्हाताऱ्याचे लक्ष त्याच्याकडे जाताच तो ओरडला, ''चोर! चोर!!'' त्याने ऑलिव्हरच्या मागे धावण्याचा प्रयत्न केला. अल्पावधीतच सर्व बाजारपेठेत ''चोर! चोर!! पकडा!!!'' अशी एकच आरोळी उठली. ऑलिव्हरला पकडण्यासाठी अनेक लोकांची धावपळ व आरडाओरड चालू झाली.

●●●

६

ऑलिव्हरच्या धावण्याचा काहीच उपयोग होण्याजोगा नव्हता. गर्दीने त्याला केव्हाच गाठले. त्याच्या तोंडावर कसलातरी जबरदस्त फटका बसला आणि तो जमीनदोस्त झाला.

त्याच्या तोंडातून रक्त ठिबकत होते. छाती धापत होती. गर्दीने जीव घुसमटला होता.

''छान बसला टोला!'' कोणीतरी म्हणाले.

''मीच हाणला तो!'' एक धटिंगण मोठ्या प्रौढीने म्हणाला.

एवढ्यात तो म्हातारा गर्दीतून वाट काढीत तेथे आला. ''अरेरे, गरीब बिचारा!'' ऑलिव्हरची स्थिती पाहून तो कळवळून म्हणाला. त्याच्याबरोबर आलेला पुस्तकांचा दुकानदार म्हणाला, ''ह्या पोराने तुमचा रुमाल खास चोरलेला नाही. तो पळाल्याने तुम्हाला शंका आली झालं. पाहा बरं, तुमचा रुमाल त्याच्यापाशी सापडतो का?''

ऑलिव्हरपाशी रुमाल सापडणे शक्यच नव्हते. एका निरपराध पोराला निष्कारण झालेल्या मारहाणीने म्हातारा चांगलाच कळवळला. त्याने एक घोडागाडी आणली व ऑलिव्हरला तीत घालून तो त्याला आपल्या घरी घेऊन गेला.

डॉजर व चार्ली फॅगीनच्या घरी येऊन दाखल झाले. त्यांच्याबरोबर ऑलिव्हर आलेला नाही हे पाहाताच फॅगीनने विचारले, ''काय रे पोरांनो, ऑलिव्हरला कुठे सोडलंत?''

''त्याला लोकांनी धरलं!'' डॉजर खाली मान घालून म्हणाला. त्याचे ते शब्द ऐकताच फॅगीन चांगलाच खवळला, ''कार्ट्यांनो, त्याचा नीट तपास करा. जर का त्याने काही माहिती दिली, तर आपण सारेच पोलिसांच्या तावडीत सापडू!''

''त्या म्हाताऱ्याने बहुतकरून त्याला आपल्या घरी नेलं असावं.'' चार्ली म्हणाला. इतक्यात त्यांच्या टोळीतील दरोडेखोर 'साईक्स' दार उघडून आत आला. त्याच्याबरोबर त्याची साथीदारीण 'नॅन्सी' होती. ''काय रे फॅगीन, कसली दंगल चालली आहे?'' त्याने आत येताच विचारले. ''आपला नवा पोरगा लोकांच्या हाती लागला आहे! कार्टं काहीतरी घात करणार अशी भीती वाटते!'' फॅगीन ज्यू म्हणाला.

''एवढंच ना? त्याला फिरून पळवून आणू म्हणजे झालं!''

''पण ते होणार कसं?''

''नॅन्सी, तू त्या पुस्तकवाल्याकडून युक्तीने त्या म्हाताऱ्याचा पत्ता आण. मग बघतो मी काय करायचं ते!''

आणि मग साऱ्यांनी विचार करून ऑलिव्हरला पळवून आणण्याची योजना आखली.

●●●

७

ब्राऊनलोनी -त्या म्हाताऱ्या गृहस्थाने- ऑलिव्हरला अर्धमेल्या स्थितीतच घरी आणले. त्यांच्या घरची दाई बेडविनबाई हिने त्याची खूपच शुश्रुषा केली. त्यांच्या घरचे डॉक्टरही काळजीने त्याच्यावर औषधोपचार करीत होते. ह्या सर्व प्रयत्नांमुळे, ऑलिव्हर सात-आठ दिवसांत चांगला हिंडू फिरू लागला.

एके दिवशी ब्राऊनलोनी त्याला आपल्या खोलीत बोलावून घेतले. तेथील पुस्तकांनी भरलेली कपाटे पाहून तो आश्चर्याने थक्कच झाला.

''अबब! किती पुस्तकं ही!'' तो म्हणाला.

''तुला वाचायला शिकायचं आहे का?'' ब्राऊनलोनी विचारले.

''मी शिकेन, पण मला तुम्ही सोडणार नाही ना इथून?'' ऑलिव्हरने केविलपणाने विचारले.

''तू नीट वागलास, तर नाही सोडणार!'' ब्राऊनलो त्याची सर्वच हकीकत विचारून घेणार होते, पण एवढ्यात त्यांचे स्नेही ग्रिमविक् आत आल्याने तो विषय तसाच राहिला. आत येताच त्यांनी ऑलिव्हरकडे पाहून विचारले, ''आज हा कोण प्राणी आणला आहे?''

''मला तरी कुठे माहीत आहे! मीच विचारणार आहे त्याला.''

एवढ्यात बेडविनबाई पुस्तकांचे एक पुडके घेऊन आत आली व म्हणाली, ''ही पुस्तकं आज परत करणार होतेत ना?''

''हो खरंच! मी विसरलोच होतो अगदी!''

''मी पोचवून येऊ का पुस्तकं?'' ऑलिव्हरने विचारले. ''जरूर. पण जपून जा व लवकर परत ये हं!'' असे म्हणून ब्राऊनलोनी त्याला पुस्तके परत करण्याची कामगिरी दिली. ऑलिव्हर बाहेर पडला तेव्हा सायंकाळ झाली होती.

थोड्याच वेळात नॅन्सीने त्याला गाठले व त्याचा हात धरून म्हटले, ''अरे पोरा, कुठे पळून गेला होतास रे! घरी आई आणि बाबा तुझी सारखी वाट पाहात आहेत?''

''कोण तू? मला माहीत नाही जा!'' तिच्या हाताशी झोंबी खेळत ऑलिव्हर ओरडला. हा प्रकार पाहून चार बघे लोक त्यांच्या भोवती गोळा झाले. त्यांना उद्देशून नॅन्सी म्हणाली, ''हा माझा धाकटा भाऊ. गेले आठ-दहा दिवस पळून गेला होता कुठे तरी!'' इतक्यात गर्दीतून चार्ली पुढे आला व त्यानेही नॅन्सीच्या बोलण्याला पुष्टी दिली. त्यामुळे लोकांनी ऑलिव्हरला उडाणटप्पू ठरवून त्यालाच दोष देण्यास सुरुवात केली. इतक्यात साईक्सही तेथे येऊन दाखला झाला. ''अरे कार्ट्या, पळून जाऊन गावात भटकतोस काय?'' त्याला एक झणझणीत टोला हाणून तो म्हणाला. ऑलिव्हरच्या कानात झण् आवाज झाला व त्याला चक्कर आल्याप्रमाणे झाले. ह्या त्रिकुटाने त्याला फरफरा ओढीतच एका अंधाऱ्या बोळात आणले. फॅगीनच्या टोळक्याच्या तावडीत आपण सापडलो आहो, ह्याची जाणीव त्याला हळू हळू झाली.

●●●

८

''मला सोडा! मला ब्राऊनलोकडे जायचं आहे!'' फॅगीनच्या घरी येताच ऑलिव्हर म्हणाला.

''अस्संऽ का?'' त्याला एक टोला हाणून फॅगीन म्हणाला.

हे लोक ऑलिव्हरला ठार मारल्याशिवाय राहाणार नाहीत ह्याची भीती वाटल्याने नॅन्सीला त्याची दया आली. ती म्हणाली, ''का मारता त्या गरीब पोराला? तो नाही फिरून बाहेर जाणार!'' पण नॅन्सीच्या ह्या मध्यस्थीचा उपयोग झाला नाही. ऑलिव्हरला मरेमरेतो मारून खोलीत कोंडण्यात आले.

एके दिवशी डॉजर व चार्ली त्याची खोली उघडून आत आले.

''काय महाराज, कशी काय आहे प्रकृती?'' त्यांनी विचारले. माराने व उपासमारीने हैराण झालेला ऑलिव्हर टेकीला आला होता. ''अरे बाबा, ऐक जरा फॅगीनसाहेबांचं, म्हणजे तुझीही आमच्यासारखी चैन चालेल. तू गप्प बसलास म्हणून काय चोऱ्या थांबणार आहेत? फुकट मरशील मात्र एक दिवस!'' त्या दुकलीच्या ह्या सल्ल्याने ऑलिव्हरचा निश्चय पुरा ढासळला व त्याने फॅगीनचे ऐकण्यास संमती दिली.

त्याच रात्री फॅगीन लपत छपत साईक्सच्या बिऱ्हाडी आला.

''काय रे थेरड्या, इतक्या थंडीचा मरत कशाला आला आहेस?'' साईक्स त्याला पाहून गुरगुरला.

''बार्नेटची कामगिरी केव्हा करणार तू?'' फॅगीनने विचारले.

''कठीण आहे! घर एखाद्या किल्ल्याप्रमाणे बंदिस्त आहे.''

''बिल म्हणत होता, एक झरोका आहे, त्यातून आत जाणं जमेल!''

''छट्! एखादं मरतुकडं पोरगं कसंबसं आत जाईल, एवढं लहान आहे ते!''

''मग हे घबाड सोडायचं म्हणतोस तर!''

''काम कठीण आहे, पण आधी पैसे दिलेस, तर पाहीन प्रयत्न करून!''

''एवढंच ना? हे घे!'' असे म्हणून फॅगीनने काही पैसे साईक्सच्या हातात कोंबले.

''झरोक्यातून आत जायला ऑलिव्हर उपयोगी पडेल का रे?'' फॅगीनने विचारले.

''फार छान! पण ते पोर तयार होणार कसं?''

''मी करतो त्याला तयार. त्याच्या हातून एकदा चोरी झाली, की ते पोर कायमचं आपलं झालं म्हणून समजा.''

''मग दे धाडून त्याला इकडे नॅन्सीबरोबर.'' थोड्याच वेळात नॅन्सी व फॅगीन बाहेर पडली.

●●●

## ९

''ऑलिव्हर, तू आज नॅन्सीबरोबर जा!'' फॅगीन घरी येताच ऑलिव्हरला म्हणाला. एवढ्या अपरात्री नॅन्सी आपणास कोठे घेऊन जाणार ह्याच बुचकळ्यात तो पडला! पण नॅन्सीला आपणाबद्दल थोडीफार सहानुभूती असल्याची जाणीव त्याला असल्याने तो जाण्यास मात्र तयार झाला. साईक्स त्याची वाटच पाहात होता. ती उभयता आत येताच तो म्हणाला, ''सडकेने हा मुकाट्याने आला, की ह्याने काही गडबड केली?''

''नाही, तो अगदीच मुकाट्याने आला!'' नॅन्सी म्हणाली. मग त्याला आपणापुढे खेचून साईक्सने आपल्या खिशातील पिस्तूल बाहेर काढले व त्याला विचारले, ''हे काय आहे माहीत आहे तुला?''

''हो!'' ऑलिव्हर म्हणाला.

मग काळजीपूर्वक पिस्तूल भरून त्याने ते ऑलिव्हरच्या कानशिलाला लावले व म्हटले, ''मी सांगितल्याप्रमाणे ऐकलं नाहीस, जरा जरी गडबड केलीस, तर हा सारा दारूगोळा तुझ्या टाळक्यात रिकामा करीन. याद राख!''

त्याच्या ह्या दमदाटीनेच ऑलिव्हर अर्धमेला झाला. मध्यरात्रीच्या सुमारास साईक्स त्याला घेऊन बाहेर पडला व बार्नेटच्या दिशेने चालू लागला.

पहाटेच्या सुमारास ते बार्नेटपाशी येऊन पोचले. अगदी एकीकडे असलेल्या घरापाशी येऊन साईक्सने दारावर थाप मारली.

''बिल बिल!!'' त्याने हलक्या आवाजात हाक मारली.

दार उघडून एक मनुष्य बाहेर आला व त्या दोघांना आत घेऊन त्याने फिरून दार लावले.

''हे पोर ठीक दिसतंय्!'' बिल ऑलिव्हरकडे पाहून म्हणाला.

''फॅगीनची निवड आहे!'' कार्टं अगदी झरोक्याच्या मापाचं आहे की नाही?

''आता तर पहाट झाली! दिवसभर विश्रांती घेऊया नि मग रात्री उडवूया बार!''

ऑलिव्हर एव्हाना श्रमाने पेंगू लागला होता. त्याला हां हां म्हणता झोप लागली.

●●●

## १०

ठाऽण् ठाऽण् बार्नेटच्या प्रार्थनामंदिरातील घड्याळाने रात्री बाराचे ठोके दिले व बिल आणि साईक्स ऑलिव्हरला घेऊन निघाले.

थंडी व धुके ह्यांमुळे दारेखिडक्या घट्ट बंद करून लोक केव्हाच झोपी गेले होते. गावात सर्वत्र कसे शांत होते.

एका घरापाशी येताच ते थांबले. सभोवती असलेल्या भिंतीवरून बिलने आत उडी टाकली. साईक्सने ऑलिव्हरला अलगद उचलून आत बिलकडे दिले व पाठोपाठ आपणही हलक्या पावलांनी आत उडी टाकली.

आपणाला येथे का आणले आहे ह्याचा उलगडा होताच ऑलिव्हर म्हणाला, ''सोडा मला, मी जातो!'' तत्काळ साईक्सने त्याची मान गप्कन पकडली व इतक्या जोराने दाबली, की ऑलिव्हरचे प्राणच गोळा झाले. ''पोरा, जरा जर आवाज केलास, तर तुझं टाळकंच फोडून टाकीन.'' पिस्तूल त्याच्या मस्तकाला लावून तो गुरगुरला.

''हात आवर. बार झाला म्हणजे सगळे लोक जागे होतील. ह्या गजाने मीच त्याच टाळकं फोडून टाकतो ना!'' बिल म्हणाला. ऑलिव्हरचे रक्त ह्या धमकावणीने पार गोठून गेले. झरोक्यापाशी येताच साईक्स त्याला म्हणाला, ''इथून तुला आत सोडतो. मुकाट्याने जाऊन पुढील दाराची कडी काढ. जरा जरी गडबड केलीस, तर गोळी घातलीच म्हणून समज!''

एवढ्यात बिलने एक मिणमिणता कंदील लावून त्याच्या हाती दिला. बिलच्या पाठीवर उभे राहून साईक्सने ऑलिव्हरला झरोक्यातून दिव्यासह आत सोडले. त्याच्यावर पिस्तूल रोखून तो बिलच्या पाठीवर झरोक्यापाशी उभा होता.

समोर जिना दिसताच न कळत ऑलिव्हरचे पाय तिकडे वळले! तत्काळ साईक्सने दबलेल्या आवाजात दटावले, ''हॉं! गोळी घालीन बघ! मुकाट्याने पुढे जाऊन कडी काढ!'' आकस्मिक दरडावणीमुळे ऑलिव्हर एवढा दचकला, की त्याच्या हातातील कंदील गळून खाली पडला व खळकन् फुटला.

''कोण आहे?'' माडीवरून आवाज आला.

''ठोऽऽ'' साईक्सचे पिस्तूल कडाडले.

''अयाईऽ मेलोऽ'' ऑलिव्हरची किंकाळी त्या शांत शांत घरात घुमली.

बिल व साईक्स भिंतीवरून उड्या मारून केव्हाच पसार झाले.

त्या घरात एकच धमाल उडाली. धावपळ चालू झाली.

●●●

## ११

ऑलिव्हर पिस्तुलाच्या गोळीने जखमी झाल्याने मायलीबाई व रोज ह्या श्रीमंत मायलेकींच्या घरी पडून होता. त्याची जखम चिंताजनक नसल्याचा अभिप्राय डॉक्टरनी दिला असल्याने त्या मायलेकींना फारशी काळजी वाटत नव्हती.

'रोज' ही सतरा आठरा वर्षांची मुलगी मोठी प्रेमळ व दयाळू असल्याने तिने ऑलिव्हरची फारच काळजी घेतली. ऑलिव्हरने तिला आपली सर्व हकीकत सांगताच तर तिला रडूच कोसळले. शेवटी ऑलिव्हर तिला म्हणाला, ''मला तुम्ही ब्राऊनलोंकडे पोचवलंत, तर फारच उपकार होतील!'' मायलीबाई व रोज ह्यांनी त्याची विनंती मान्य केली. ऑलिव्हरला स्वत:च लंडनला घेऊन जाण्याचे त्यांनी ठरविले.

एके दिवशी त्या दोघी ऑलिव्हरसह लंडनमधील आपल्या 'सुखनिवास' ह्या बंगलीत येऊन दाखल झाल्या. इकडे साईक्स परत घरी आला, तो तापाने आजारीच पडला.

नॅन्सीने चार-सहा दिवस जिवापाड त्याची शुश्रुषा केल्याने तो आता कसाबसा हिंडू-फिरू लागला होता.

एके दिवशी फॅगीन व डॉजर त्याच्याकडे आले.

''ऑलिव्हरची काय वार्ता रे?'' फॅगीनने विचारले.

''मी त्याला गोळी घालून ठार केलं.'' साईक्स बेफिकीरपणाने म्हणाला.

''मूर्ख आहेस! तो जिवंत तर आहेच, पण त्या श्रीमान् मायलेकींबरोबर लंडनमध्ये आला आहे.''

''आँऽ!''

''आँ ऽ काय? त्याला हस्तगत करून त्याचा निकाल लावलाच पाहिजे!''

''कुठे आहे तो?''

''सुखनिवास बंगलीत!''

''ठीक आहे. आता त्याला जिवंत ठेवण्यात अर्थ नाही. हे कार्टं आपणा सर्वांचाच घात करील एके दिवशी!!''

मग ऑलिव्हरला हस्तगत करण्याचा त्यांचा विचार चालू झाला. नॅन्सी ह्या प्रकाराने बेचैन झाली. तिने मनाशी काही विचार केला व ती म्हणाली, ''मी जरा बाहेर जाऊन येते हं!''

फॅगीनने खूण करून डॉजरला तिच्या मागावर राहाण्यास सुचविले. पण नॅन्सीच्या ते ध्यानी आले नाही.

मध्यरात्रीच्या सुमारास डॉजर धावत, पळत, धापा टाकीत घरी आला. ''घात झाला!'' तो ओरडला. ''नॅन्सीने त्या बायांना सावध केलं व त्या ऑलिव्हरला घेऊन ब्रॉऊनलोंच्या घरी आश्रयास गेल्या!''

''नॅन्सी तिथेच गेली काय?''

''नाही! आपणास शंका येऊ नये, म्हणून ती परत फिरली आहे!'' आणि एवढ्यात नॅन्सी परत आली.

●●●

## १२

''कुठे गेली होतीस? बोल!'' तिचा हात पकडून साईक्स ओरडला.

''कुठे नाही! फिरून आले जरा!!'' नॅन्सी गयावया करून म्हणाली.

''अस्सं काय!'' असे म्हणून साईक्सने पिस्तुलाच्या दस्त्याने तिच्या मस्तकावर ताडकन् जोराने प्रहार केला. फॅगीन, डॉजर, ह्यांनी काही तरी भयंकर प्रकार होणार हे ओळखून, पळ काढण्याची तयारी केली. साईक्सने नॅन्सीच्या मस्तकात तडातड् घाव घालून तिला ठार केले. इकडे ब्राऊनलोंच्या घरी ऑलिव्हरने आपली सर्व हकीकत निवेदन केली होती व त्यांनी पोलिसांना तत्काळ सर्व वर्दीही दिली होती.

नॅन्सीला ठार करून पळण्याच्या तयारीत असतानाच साईक्सच्या घराला पोलिसांनी वेढा दिला. त्यांची चाहूल

लागताच साईक्सने स्वत:च्या मस्तकावर पिस्तूल झाडून आत्महत्या केली. फॅगीन व डॉजर ह्यांना पकडण्यात आले. फॅगीनवर अनेक आरोप शाबीत झाल्याने न्यायमूर्तींनी त्याला फाशीची शिक्षा दिली.

त्याला तुरुंगाकडे नेताना हजारो लोकांनी त्याच्यावर दगड-विटांचा वर्षाव केला.

आज फॅगीनला फाशी देण्यात येणार होते. तो आपल्या कोठडीत तळमळत पडला होता. त्याची सर्व पापे त्याला खायला उठली होती. भीतीने त्याच्या सर्व नसा कशा गारठून आखडून गेल्या होत्या. फाशीकडे नेणाऱ्या पहारेवाल्याचे पाय वाजू लागताच त्याने भीतीने एक किंकाळी फोडली व तो मरून पडला. फाशी देण्याच्या आधीच त्याचा प्राण निघून गेला.

बंबल व मॅनबाई ह्यांना सक्त ताकीद मिळाल्यामुळे ती उभयता आता अनाथ मुलांशी चांगली वागू लागली आहेत. ब्राऊनलोंना मूलबाळ नसल्याने त्यांनी ऑलिव्हरला आपणाकडेच ठेवून घेतले. अधून मधून तो मायलीबाई व रोज ह्यांच्याकडे राहाण्यास जाई.

●●●